|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

**बातमी - १**

जळगाव १२ (   ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्त डॉ.सौमिया पंडीत,(वरिष्ठ अनुशास्त्रज्ञ, अनुविज्ञान संस्थान, डूबना, रशिया) तसेच डॉ.प्रिया सक्सेना (रसायनशास्त्रज्ञ, तेल-अवीव,इस्त्राईल) यांच्याशी विडीओ कॉन्फरन्सद्धारे विद्यार्थ्यांशी संवादाचे आयोजन करण्यात आले होते.

सावित्रीबाई फुले स्मृतिदिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ.प्रिया यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाल्या की, स्त्री कुठल्याही परिस्थितीशी लढून स्वत:चा विकास घडवू शकते आणि तशी शक्ती तिच्यात असते. तर डॉ. सौमिया यांनी समाज तुमच्या बद्दल काय म्हणते याचा विचार न करता फक्त स्वप्न पाहा आणि त्यात झोकून द्या असा सल्ला त्यांनी यावेळी दिला. सामाजिकशास्त्रे प्रशाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे उत्तरे या शास्त्रज्ञांनी यावेळी दिली.

यावेळी सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या संचालिका डॉ.अर्चना देगावकर, प्रा.उमेश गोगडिया, हर्षल पाटील, प्रा.स्मिता देशमुख, प्रा.वर्षा पालखे, प्रा.दिपक सोनवणे, प्रा.मनोज इंगोले, प्रा.उत्तम मदने यांचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते तसेच सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी फॉर सस्टेनेबल फ्युचर या विषयावर प्रा.भुषण चौधरी यांचे व्याख्यान आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक प्रा.जे.बी.नाईक होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.विशाल पराते यांनी तर आभार प्रा.तुषार देशपांडे यांनी मानले.

------------

**बातमी - २**

जळगाव १२ (   ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात उद्या दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी स्पिकमॅके अंतर्गत जगविख्यात कलाकार पं.रुपक कुळकर्णी यांच्या बासरी वादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात सकाळी ११ वाजता पं. रुपक कुळकर्णी यांच्या बासरी वादनाचा कार्यक्रम होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील हे राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थितीचे आवाहन कुलसचिव भ.भा.पाटील यांनी केले आहे.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दि. १२ मार्च, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
जनसंपर्क अधिकारी यांचे करीता